# राशिभविष्य - ऑक्टोबर, २०२०.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

======================================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी त्या त्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे व्याधी, पीडा, आजार, अन्य समस्या यांचे निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आला तर कृपया आम्हांस कळवावे.**

======================================================================

**(१) मेष** - या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत हर्षल असल्यामुळे सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अस्थिर, लहरी, चंचल झाला असण्याची शक्यता आहे. या राशीची लहान मुले तर अतिशय वांड, खोडकर झाली असण्याची शक्यता वाटते. पण हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र

असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत राहू असून त्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. तसेच कुटुंबात कलह होतील. या राशीच्या पंचम स्थानी सिंह राशीत शुक्र असून या राशीच्या सर्व प्रकारच्या कलावंत मंडळींना आपल्या कलेतील प्रगतीचे समाधान लाभेल. येथील शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या षष्ठ स्थानी जाईल; पण त्याचा फारसा उपयोग होणार नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत रवि असून तो दशम या नोकरी-व्यवसाय स्थानास पूरक होईल. हा रवि भाग्योदयकारक असून त्यामुळे सुखशांती लाभेल. हितशत्रू पराभूत होतील. महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत गेल्यावर अनारोग्यकारक होईल व त्यामुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. पण तो केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होईल. या सप्तम स्थानी तुळा राशीत बुधही आहेच. पण तो प्रतिकुल होईल व त्यामुळे दु:ख, भांडणे सहन करावी लागतील. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत केतु असल्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते, तसेच कुटुंबात कलह होतील. हा केतु अनारोग्यकारक असून काही मंडळींना त्वचा रोगाचा तर काही मंडळींना रक्तविकाराचा किंवा मुख-दंत -विकाराचा आजार त्रस्त करील. शिवाय तो अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या भाग्यस्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून तो आध्यात्मिक प्रगतीस अनुकुल होईल. सद्गुणांची वाढ होईल, अपेक्षित संधी प्राप्त होईल. प्रवासाचे योग येतील. काही भाग्यवंतांना कीर्ति -प्रसिद्धी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी मकर या स्वराशीत शनि असून तो कोळसा, लोखंड यांचा व्यापार-व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत असलेला नेपच्यून प्रतिकुल असून त्याच्यामुळे आर्थिक घोटाळे, आर्थिक नुकसान, अर्थप्राप्तीस विलंब होणे संभवते. काही मंडळींना कुमार्गी मित्रांमुळे मनस्ताप सहन करावा लागेल. त्यामुळे गहिरे नैराश्य येईल. जपा. या राशीच्या व्ययस्थानी मीं राशीत वक्री मंगळ असून तो प्रतिकुल व अशुभ असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता, भांडणे, मानहानी, अस्वस्थ मनस्थिती यांचा त्रास सहन करावा लागेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र

अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनी कुमाराभ्याम नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ-** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत राहू असल्यामुळे सतत् अपमान होणे संभवते. तसे घडले तर मनात सूडभावना निर्माण होईल. तसेच या राहूमुळे काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह राशीत शुक्र असून त्याच्यामुळे ऐषाराम, सुख लाभेल. ज्यांची शेतीवाडी आहे अशा मंडळींना त्यापासून लाभ होईल. या राशीच्या पंचम स्थानी कन्या राशीत रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी जात आहे. महिन्याच्या पूर्वार्धात हा रवि प्रतिकुल होईल व त्यामुळे अनारोग्य, अपघात, संततिपैकी कोणास आजार, नोकरीत वरिष्ठांचा जाच, कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे होणारे स्थलांतर अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र ग्रह या राशीच्या पंचम स्थानी आल्यावर या राशीच्या केवळ कलावंत मंडळींनाच सुखसमाधान देईल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर दशम या नोकरी-व्यवसाय स्थानास पूरक व भाग्योदयकारक होईल सुखशांती लाभेल. हितशत्रू पराभूत होतील. या राशीच्या षष्ठ स्थानी बुधही आहेच. तो अनुकुल होईल व त्यामुळे कार्यसिद्धी होईल. धनलाभ होईल व काहींना प्रसिद्धी मिळेल. पण काही मंडळींना ह्रदयविकाराचा आजार होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. मनस्थिती अस्थिर राहील. या राशीच्या अष्टम स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून त्याच्यामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. या राशीच्या भाग्यस्थनी मकर या स्वराशीत शनि असून तो सर्वसाधारणपणे शुभ होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर राहील. पण हा नेपच्यून मनोवैज्ञानिक आणि द्रव पदार्थांचे व्यापारी यांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत वक्री मंगळ असल्यामुळे मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. कष्ट परिश्रम केल्यासच अर्थप्राप्ती होईल. या राशीच्या व्यय स्थानी मेष राशीत असलेला हर्षल प्रतिकुल असून त्याच्यामुळे सांपत्तिक अडचणी, वाईट प्रसंग, काहींना तर जिवावरच्या प्रसंगाला सामोरे जावे लागण्याची शक्यता दिसते. अकारण शत्रुत्व निर्माण होईल व काही मंडळींना बेअब्रूच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर " श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी "ओम ब्रह्माय नमः:" मंत्राचा
आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी " ओम सोम सोमाय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या तृतीय स्थानी सिंह राशीत शुक्र असून या शुक्रामुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. शिवाय या शुक्रामुळे काही मंडळींना भूमिलाभ तर काही मंडळींना मानाचे स्थान किंवा प्रतिष्ठा प्राप्त होईल. शिवाय त्यांना धनलाभही होईल. येथील शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत .जात आहे. चतुर्थस्थानी रवि ग्रह आहेच. या स्थानी रवि प्रतिकुल असल्यामुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, कौटुंबिक त्रास, आर्थिक चिंता अशापैकी समस्या त्रस्त करतील. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्रामुळे ऐषाराम, सुखसमाधानकारक घटना घडतील. शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत जात आहे. त्या स्थानी बुध आहेच. हा बुध भयकारक असून संततीपासून त्रास होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि प्रतिकुलच होईल व त्यामुळे नोकरीत वरिष्ठांचा जाच, प्रिय जनांपासून दुरावा, संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या, स्वतः:चे अनारोग्य, अपघातभय अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे असह्य मनस्ताप होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत असलेला केतू अनुकुल होईल व त्यामुळे आरोग्य सुधारेल व मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या सप्तम स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ होतील. काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल. नवे स्नेहसंबंध निर्माण होतील. प्रवासाचे योग येतील. अर्थलाभही होईल. या राशीच्या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो अनारोग्यकारक होईल. अपेक्षाभंग होणे, असमाधानकारक घटना घडणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून तो अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत वक्री मंगळ असून त्याच्यामुळे स्वतंत्र व्यवसाय करत असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. नोकरीत कामाचा ताण, वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत हर्षल असून
त्याच्यामुळे काय घडेल ते निश्चितपणे सांगता येणार नाही. मित्राशी भांडणे होतील. शत्रुत्व होईल ;पण अर्थलाभ होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत राहू असून तो अनुकुल होईल व त्यामुळे हितशत्रूंचा नाश होईल. अर्थलाभ होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोम सोमाय नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी " ओम नम: शंकराय " मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम आदितीये नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या धनस्थानी सिंह राशीत शुक्र ग्रह असून तो कौटुंबिक सुखाचे दृष्टीने अनूकुल, प्रगतिकारक व सुखकारक होईल. त्याच्यामुळे धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत रवि असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात धनस्थानी असलेला शुक्र तृतीय स्थानी येत आहे. येथील रवि महिन्याच्या पूर्वार्धात सर्व दृष्टीनी सुखकारक असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील. नोकरीत वरिष्ठ प्रसन्न होतील. धनलाभ होईल व क्वचित

कोणास एखादे मानाचे उच्च स्थानही मिळू शकेल. पण येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्यामुळे कौटुंबिक त्रास, अनारोग्य, दु:ख, आर्थिक चिंता, नियोजित कार्यात होणारी दिरंगाई अशापैकी कारणांनी मन अस्वस्थ राहण्याची शक्यता आहे. याच चतुर्थ स्थानी बुध ग्रहही आहे. त्याच्यामुळे काही प्रमाणात गृहसौख्य व मित्रसुख लाभेल. या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून त्याच्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राहील. काही मंडळींना नोकरचाकरांचे सुख मिळेल. हा गुरु दशम स्थानास पूरक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे शांत वृत्ती राहील. पण या राशीच्या विवाहेच्छूना विवाह योग येणे संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून तो जलभकारक व विषयकारक असल्यामुळे शक्यतो जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत वक्री मंगळ असल्यामुळे शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात अडचणी, अडथळे, मनस्ताप, मानहानी होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत हर्षल असून तो बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. नोकरीत बढती मिळेल. व्यवसायात वाढ होईल. या राशीच्या लाभस्थानी वृषभ
राशीत राहू असून त्याच्यामुळे काही मंडळींना संततिविषयक चिंता त्रस्त करील. ज्यांच्या हाती सत्ता,
अधिकार आहे अशापैकी काहींना वाममार्ग धन प्राप्त करण्याचा मोह निर्माण होईल. पण त्यांनी मोहावर ताबा ठेवून सरळ मार्गाने आचरण करावे. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. ज्यांना जुगाराचा नाद असेल त्यांनी तो नाद सोडावा. लाभापेक्षा हानी होणेच संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच दररोज स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम आदितीये नमः: " मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी "ओम सर्पाय नमः:" मंत्राचा मनापसून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत शुक्र असून तो सुखकारक व मनस्वास्थ्य देणारा असल्याचा अनुभव येईल. हा शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत जात आहे. या धनस्थानी कन्या राशीत रवि आहेच. पण येथील रवि आर्थिक चिंता व
वित्तहानी करणारा असल्याचा अनुभव येईल. त्याच्यामुळे कुटुंबात भांडणे होतील. शिवाय काही मंडळींना डोळ्याच्या अनारोग्याचा त्रास होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्रामुळे या
राशीच्या मंडळींना कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनलाभ होणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत गेल्यावर अनुकुल होईल. आरोग्य उत्तम राहील. नोकरीत वरिष्ठ कामावर खूष होतील. काही मंडळींना बढती, पगारवाढ होईल. काही मंडळींचा मानसन्मान होईल तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. पण

या स्थानी असलेला बुध ग्रह प्रतिकुल असून त्याच्यामुळे शत्रुत्व निर्माण होणे, राजद्रोह होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही. तो चिंता निर्माण करील. तसेच तो विषभयकारकही आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून तो सर्व दृष्टींनी सुखकारक होईल. अर्थलाभ होईल. प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे गैरसमज, भांडणे शत्रुत्व निर्माण होणे संभवते. तसेच तो अनारोग्यकारक होणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा, संकटे येणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत वक्री मंगळ ग्रह असून त्याच्यामुळे उष्णताविकाराचे आजार बळावण्याची शक्यता आहे. विशेषकरून मूळव्याधीसारखे: आजार त्रस्त करतील. त्याशिवाय हाडमोड होणेही संभवते. तसेच हा मंगळ जलभयकारक व वीजभयकारक असल्यामुळे जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच विजेवर चालणारी उपकरणे सावधानतेने हाताळा . या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत हर्षल असून तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल , प्रगतिकारक व यशदायक होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील, तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो नोकरदार मंडळींना अनुकुल होईल व काही मंडळींना अधिकारपद मिळेल तर काहींना सत्तास्थान मिळेल. क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगायत्री उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर गायत्रीमंत्राचा बारा वेळा जप करा. त्याचप्रमाणे दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः " मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी " ओम भगाय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या व्ययस्थानी सिंह राशीत शुक्र असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत येत आहे. प्रथम स्थानी या राशीत रवि ग्रह आहेच. पण हा

रवि प्रतिकुल असून त्याच्यामुळे अनारोग्य, मनस्ताप होणे संभवते. तसेच विविध कारणांनी तो चिंतादायक होणार आहे. काही मंडळींना थकावट जाणवेल. काही मंडळींना रक्तदाबाचे दुखणे त्रस्त करील. ज्यांना हृदयविकार आहे त्यांनी मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात येथील शुक्रामुळे काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत बुध असून महिन्याच्या उत्तरार्धात प्रथम स्थानी असलेला रवि धनस्थानी तुळा राशीत येत आहे. पण या स्थानी असणारे रवि -बुध हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होणार असून त्यांच्यामुळे दु:ख, नेत्रविकार, वित्तहानी, भांडणे, आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. पण बुधामुळे धनलाभ होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे मानसिक दु:ख सहन करावे लागण्याची शक्यता आहे. पण या केतूमुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून त्याच्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. ज्यांना स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार करावयाचे असतील तर ते अपेक्षेनुसार पार पडतील. पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. या राशीच्या पंचम

स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे या राशीच्या बुद्धिमान मंडळीचाही स्वभाव स्वार्थी, व्यवहारी, संशयी होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना उगीचच एखादी आजारभावना किंवा काल्पनिक चिंता त्रस्त करील. काही मंडळींना फसवणुकीचा त्रास होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत वक्री मंगळ असून त्याच्यामुळे पतिपत्नीपैकी कोणाचे अनारोग्य, दोघांतही वाद, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार, व्यवसाय आहे त्यांच्या व्यवसायात गैरसमज, संशय, मतभेद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत हर्षल असून तो धोकादायक व अपघातकारक आहे. त्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत राहू असून त्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याचप्रमाणे दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः: " मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम सूर्याय नमः: " मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी " ओम त्वष्टे नमः: " मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या व्ययस्थानी कन्या राशीत रवि असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात लाभस्थानातील शुक्र व्ययस्थानी कन्या राशीत जात आहे. तसेच व्ययस्थानी असलेला रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत येत आहे. तेथे बुध ग्रहही आहेच. त्यामुळे हे रवि -बुध या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्यांच्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, दु:ख, चिंता, पराजय, आर्थिक चिंता त्रस्त करतील. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. बुधामुळे चित्त चंचल होणार असून धननाश, मित्रद्रोह, कुसंगती यांचा त्रास होणे संभवते. जपा. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्रामुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून त्याच्यामुळे प्रवासाचे योग येतील, या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल. पण भावंडांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे दु:ख, नैराश्य, गृहसौख्य हानी होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल आणि ज्यांना अध्यात्मात रस आहे अशांना उपासनेद्वारे अध्यामात प्रगती करणे शक्य होईल. तसेच गूढ संशोधनात प्रगती होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत वक्री मंगळ असून तो अनारोग्यकारक होईल व काही मंडळींना ताप येईल, काहींना इजा होईल. काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास होईल. आर्थिक हानी होईल. चोरी होणेही संभवते. हृदयविकार असणारांनी मनाचा क्षोभ होणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे पतिपत्नीत वाद, भांडणे, मतभेद होणे संभवते. त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. भागीदारीत ज्यांचा व्यापार-व्यवसाय आहे अशांनी गैरसमज, वाद, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. पण काही भाग्यवंत मंडळींना अचानक धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी सिंह

राशीत असलेला शुक्र अनुकुल होईल व सर्व प्रकारचे सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत केतू असून त्याच्यामुळे वाहनधोका आहे. म्हणून रस्त्याने चालताना सतत सावधानतेने चाला. वाहन नियंत्रित वेगानेच चालवा. वाहन चालवत असताना मोबाईलवर वार्तालाप करू नका. या राशीच्या धनस्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून तो आरोग्यदायक आहे. शिवाय त्याच्यामुळे उत्तम अर्थलाभ होईल. त्यामुळे कर्जफेड होईल. कुटुंबात शुभ घटना घडतील. व्यवसाय वाढ होईल. या राशीच्या तृतीय स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळेल. पण काहींना भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे घरगुती गोष्टीबाबत घोटाळे, गैरसमज निर्माण होतील. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत वक्री मंगळ असून त्यामुळे अनारोग्य, स्थावर समस्या, संततीसंबंधीचा त्रास होणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे काही मंडळींना मुदतीचा ताप येणे संभवते. मनस्थिती चंचल राहील. या राशीच्या मंडळींनी सतत् अति खोल विचार करू नये. मेंदूला विश्रांती द्यावी. नपेक्षा डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. पण हा हर्षल या राशीच्या दशम स्थानास पूरक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे मनात कपटी विचार प्रबळ होतील. वाममार्ग धन मिळविण्याचा विचार अस्वस्थ करील. शिवाय वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. या राशीच्या दशम स्थानी सिंह राशीत शुक्र असून त्याच्यामुळे स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होतील. त्यामुळे मनस्ताप होईल. येथील शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या लाभस्थानी कन्या राशीत जात आहे. त्यामुळे तो अनुकुल व धनलाभदायक होईल. मनोनुकुल घटना घडतील. या लाभस्थानी असलेला रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्यामुळे व्यावसायिकाच्या व्यवसायात वाढ होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना बढती, अर्थलाभ, काहींना मानाचे स्थान तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणे संभवते. आरोग्य उत्तम राहील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर प्रतिकुल
होईल व त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील, हाती घेतलेल्या कार्यात अपयश येईल. त्यामुळे नैराश्य येईल. या स्थानी असलेला बुध ग्रहही प्रतिकुल असून त्यामुळे अपयश, मानहानी, अनारोग्य
होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांति लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर " श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः: " मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी _ "ओम इंद्राय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु-** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत गुरु ग्रह असून तो बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल होईल. हा गुरु शुभ असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील. या राशीच्या धनस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो प्रतिकुल होईल व त्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. त्याशिवाय काही मंडळींच्या जीवनात आर्थिक संकटे त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अतिशय भावनाशील होईल. पण तो अध्यात्मात रस असणारांना अनुकुल होईल. तसेच गूढ संशोधन कार्यात यश देईल. त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाचे तर काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत वक्री मंगळ असून त्याच्यामुळे कुटुंबात वाद, भांडणे, गैरसमज निर्माण होतील. तसेच असमाधानकारक घटना व अन्य कटकटी घडणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत हर्षल असून तो बौद्धिक संशोधन कार्यास अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे मनात धूर्त, कावेबाज विचार येतील. पण त्याच्यामुळे हितशत्रूंवर विजय मिळेल. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या भाग्यस्थानी सिंह राशीत शुक्र असून त्याच्यामुळे काही मंडळींना गुरुकृपा तर काहींना थोरकृपा, सूसंगती प्राप्त होईल. क्वचित कोणास कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी जात आहे. त्यामुळे या महिन्याच्या संपूर्ण काळात तो या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मोठ्या ओळखी होतील व प्रतिष्ठा प्राप्त होईल. अर्थलाभ होईल. लाभस्थानी असलेल्या बुधामुळे सुखसमाधान लाभेल व नवे मित्र मिळतील. भाग्यस्थानी असलेला शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या दशम स्थानी आल्यावर स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण करील. या राशीच्या व्ययस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव लहरी, चंचल होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निॠतये नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत शनि असून त्याच्यामुळे पतिपत्नीपैकी दोघांनाही अनारोग्याचा त्रास होणे संभवते. तसेच नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येण्याची शक्यता आहे. कुटुंबातील कोणाचे दूरत्व निर्माण झाल्यास अस्वस्थ व्हाल. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे विविध प्रकारे आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत असलेला मंगळ वक्री असल्यामुळे अनुकुल असून धैर्य, हिंमत वाढली तरी महत्त्वाकांक्षा व कर्तबारीत बाधा येण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही. आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. वास्तुसुख लाभणार नाही, सतत तक्रारी करत राहाल. जपा. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना अनुकुल होणार असला तरी तो संततिसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. या राशीच्या

अष्टम स्थानी सिंह राशीत शुक्र ग्रह असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना फारसे काही नकरता अपेक्षित अर्थप्राप्ती होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा शुक्र या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर या राशीच्या काही मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी मिळण्याची शक्यता आहे. या राशीच्या भाग्यस्थानी कन्या राशीत रवि आहेच. पण त्याच्यामुळे अनारोग्य, मानसिक ताण, विरोध सहन करावा लागेलसे दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत गेल्यावर नोकरी-व्यवसायास अनुकुल होईल व सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना विविध प्रकारे लाभदायक होईल. या दशम स्थानी तुळा राशीत बुध ग्रह आहेच. तोही अनुकुल होईल व त्याच्यामुळे अर्थप्राप्तीशिवाय कौटुंबिक व मानसिक सुखशांती लाभेल. या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत केतू असून तोही अनुकुल होईल व त्याच्यामुळे हाती घेतलेल्या कामात यश मिळेल. धनलाभ होईल व सुखसमाधान लाभून प्रवासयोग येतील. या राशीच्या व्ययस्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून त्याच्यामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. सामाजिक कार्याची आवड असणारांना त्यांच्या कार्यात प्रगती करणे शक्य होईल. पण या गुरुमुळे कौटुंबिक त्रास सहन करावे लागतील. अपेक्षाभंग होईल. तसेच प्रवासात अडचणी येतील. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः” मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ-** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत नेपच्यून असून या नेपच्यूनमुळे आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळे, अर्थप्राप्तीस विलंब होणे संभवते. अशा परिस्थितीत कुमार्गी मित्रांचा संसर्ग झाल्यास नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत वक्री मंगळ असून त्याच्यामुळे विविध प्रकारे आर्थिक समस्या त्रस्त करतील. शिवाय उष्णताविकार बळावून घसा, मान, दाढा, डोळे यापैकी कशाचे तरी अनारोग्य त्रस्त करील. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे चौकस, उच्च बौद्धिक शक्ती, स्मरणशक्ती, आकलनशक्ती प्राप्त होईल. ती उच्च बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत राहू असून तो कौटुंबिक सुखाचे दृष्टीने प्रतिकुल होईल. कौटुंबिक त्रास, अन्य कटकटी, अपयश अशापैकी कारणांनी मनस्ताप होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी सिंह राशीत शुक्र असून जीवनसाथी/संगिनी कलाकार असेल तर वैवाहिक जीवनातील सुखात अधिकच भर पडेल. तसेच ज्यांची प्रेमप्रकरणे असतील त्यापैकी काहींचे प्रेमविवाह संपन्न होतील. या संपूर्ण महिन्याच्या काळात रवि ग्रह या राशीच्या अष्टम -नवम स्थानी असणार आहे. महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह एकटाच अष्टम स्थानी असेल; पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात सप्तम स्थानी असलेला शुक्र अष्टम स्थानी येईल. त्यावेळी काही मनोनुकुल घटना घडतील. पण रवि -बुध संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुल, मनस्ताप देणारा, अनारोग्यकारक, मानहानी करणारा तसेच बुधामुळे भांडणे, कार्य दिरंगाई करणारा, अडथळे निर्माण करणारा

असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी आहे ती नोकरीच मनापासून करावी. या राशीच्या लाभस्थानी याच राशीत गुरु ग्रह असून तो पूर्णपणे अनुकुल , सुखकारक अर्थलाभ देणारा, मनोनुकुल घटना घडवणारा व मन:शांती देणारा असल्याचाच अनुभव येईल. पण या राशीच्या व्यय स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, मानहानी, मनस्ताप सहन करावा लागेल. या काळात सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वकच करा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी " ओम वसवे नमः" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः: " मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी " ओम अजैकचरणाय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत वक्री मंगळ असून त्याच्यामुळे शरीरपीडा, अकारण श्रम, दगदग होणे संभवते. स्वभाव ,हट्टी , संतापी, मानापमान फार असणारा असा घडणारा होणे संभवते. शिवाय तो वक्री असल्याने अनारोग्यकारक होणेही संभवते. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत हर्षल हा विक्षिप्त स्वभावाचा ग्रह असल्याने स्वभाव अति अस्थिर, अविचारी, फटकळ स्वभावाचा होईल. त्यामुळे हातून अविचाराने खर्च होणे संभवते. हातून विचित्र आचरण घडेल . आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होईल. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत
राहू असून तो अनुकुल होईल व त्यामुळे स्वभाव हरहुन्नरी होईल व हातून एखादे पराक्रमी कर्तृत्व घडून येईल. या राशेच्या षष्ठ स्थानी सिंह राशीत शुक्र असून तो सर्व प्रकारच्या कलाकारांना अनुकुल होणार नाही. कलेत उच्च गुणवत्ता असूनही अपेक्षित प्रगती होणार नाही. तसेच कलागुण प्रदर्शित करण्यासाठी योग्य संधीच मिळणार नाही. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा शुक्र या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत जाईल. या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत रवि आहेच. तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत जात आहे. त्यामुळे या महिन्याच्या संपूर्ण काळात हा रवि प्रतिकुल होणार असून तो अनारोग्यकारक, दु:खदायक, अपयश देणारा, संतिसुखात बाधा आणणारा, मानहानी करणारा असल्याचाच अनुभव येईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला शुक्र या राशीच्या सप्तम स्थानी
कन्या राशीत आल्यावर वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा
राशीत असलेला बुध अनुकुल, सुखकारक व सिद्धिदायक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे धूर्त, ढोंगी आचरण होणे संभवते. शिवाय संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून तो बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे अर्थलाभ होईल; पण त्याच्यामुळे काही कारणाने संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ

राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे चिंता, मानसिक व्यग्रता, नैराश्य येणे संभवते. पण हा नेपच्यून गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना उपयुक्त होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा ”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः: “ मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ ओम पूषाय नमः: “ मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

=====ooooo0ooooo=====